महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

# अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

आदिवासी विकास भवन, तळ मजला, गडकरी चौक, जुना आग्रा रोड,
नाशिक ४२२ ००२.

दूरध्वनी क्र.२५७८५६८ फॅक्स क्र.२५७८५६८

E_mail : atc.nsk-mh@nic.in

## जाहिरात

**अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक** हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील नाशिक, कळवण, जि.नाशिक, नंदुरबार, तळोदा, जि.नंदुरबार, धुळे, यावल, जि.जळगांव, राजूर, जि.अहमदनगर या प्रकल्पांतर्गत असलेली शासकीय आश्रमशाळा / शासकीय वसतिगृहातील विविध वर्ग-३ संवर्गाची खालील रिक्त पदे भरण्याकरिता पात्रता धारक उमेदवारांकडुन विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागवित आहेत.

| पदाचे नाव | पद संकेतांक | पदांची संख्या |
|---|---|---|
| अधिक्षक (पुरुष) | १ | २२ |
| अधिक्षक (स्त्री) | २ | ११३ |
| गृहपाल (पुरुष) | ३ | १० |
| गृहपाल (स्त्री) | ४ | ०५ |
| **एकूण** | | **१५०** |

**टिप:- जाहिरातीत नमुद केलेल्या पदसंख्येत बदल होऊ शकतो.**

**http://maharecruitment.mahaonline.gov.in. या संकेतस्थळावर जाहिरात व पद भरतीसंबंधीच्या सविस्तर सुचना उपलब्ध असून, दिनांक ०३/०४/२०१७ ते दिनांक २४/०४/२०१७ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत पात्रताधारक उमेदवारांनी अर्ज करावेत. समांतर आरक्षण व भरती संबंधीच्या अटी-शर्ती इ. संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**

स्वाक्षरी/-
अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नाशिक

| | | |
|---|---|---|
| पद ज्या वर्गातील व सेवेतील असेल तो वर्ग व ती सेवा: | | वर्ग- ३ |
| नोटीस देऊन नियुक्ती समाप्त करण्यात येते काय, असल्यास, कोणत्या शर्तीवर ? | | होय, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीचे पालन न झाल्यास नियुक्ती समाप्त करण्यात येते. |
| (अ) कर्तव्य | | नियमानुसार. |
| (ब) उमेदवारांना जेथे सेवा करावी लागेल त्या कार्यालयाचे/कार्यालयांचे ठिकाण / ठिकाणे | अधिक्षक (स्त्री / पुरुष) | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभागातील नाशिक / कळवण / तळोदा / धुळे /नंदुरबार / यावल / राजूर या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये अंतर्गत शासकीय आश्रमशाळा |
| | गृहपाल (स्त्री / पुरुष) | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभागातील नाशिक / कळवण / तळोदा / धुळे /नंदुरबार / यावल / राजूर या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये अंतर्गत शासकीय वसतिगृहे |
| निवडण्यात आलेल्या उमेदवारांना कामावर केव्हा यावे लागेल ? | | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत |
| परिविक्षाधिन कालावधी | | सर्व पदांवरील नियुक्ती २ वर्षे कालावधीसाठी परिविक्षाधीन म्हणून करण्यात येईल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतरच नियुक्ती नियमित होईल. |
| पदोन्नतीच्या संधी | | शासन नियमानुसार |
| आवश्यक शैक्षणिक अर्हता | | खालीलप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| १ | **अधिक्षक (पुरुष) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-** | समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी B.S.W. |
| २ | **अधिक्षक(स्त्री) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-** | समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी B.S.W. |
| ३ | **गृहपाल (पुरुष) वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/-** | समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी ( M.S.W.) |
| ४ | **गृहपाल (स्त्री) वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/-** | समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी ( M.S.W.) |

| | |
|---|---|
| समान अर्हतेचा स्वीकार करता येईल काय अशा अर्हता कोणत्या ? | नाही. |
| वयोमर्यादा (कोणतीही असल्यास) | वरील सर्व पदांसाठी जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकास वय किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांना ५ वर्षे शिथील.<br>समांतर आरक्षणासाठी वयोमर्यादा<br>१) अपंग- ४५ वर्षे<br>२)माजी सैनिक- ४५ वर्षे,<br>३)खेळाडू- विहित वयोमर्यादेत ५ वर्षे वयात शिथील .<br>४) प्रकल्पग्रस्त- ४५ वर्षे |

| | |
|---|---|
| | ५) अंशकालीन / १९९१ ची जनगणना / १९९४ निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी-४६ वर्षे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| अधिवास | महाराष्ट्र |

## उमेदवार निवडीची पध्दती

१. पद क्र १ ते ४ वरील पदांकरीता मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दीक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा असेल.
२. इंग्रजी, मराठी व सामान्यज्ञान या विषयाचे १०० गुणांचे ५० प्रश्न अधिक्षक व गृहपाल या पदासाठी समान असतील, तर उर्वरित १०० गुणांचे ५० प्रश्न अधिक्षक व गृहपाल या पदासाठी वेगवेगळे असतील.
३. शासन नियमाप्रमाणे गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने लेखी परीक्षेत मागासवर्गीय उमेदवारांना ४५ % (९० गुण) व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना एकुण गुणाच्या किमान ५० % (१०० गुण) प्राप्त करणे आवश्यक राहील.

## लेखी परिक्षेचे स्वरुप :-

| पद संकेतांक | परिक्षेची काठीण्य पातळी |
|---|---|
| १ व २ | पदवी स्तर |
| ३ व ४ | पदव्युत्तर पदवी स्तर |

# --सर्वसाधारण सूचना--

१. अधिक्षक (स्त्री/पुरुष) संवर्गासाठी उमेदवारांनी शासकीय आश्रमशाळांची यादी सोबत जोडली असून, ती कृपया पाहावी. यादीतील आश्रमशाळेच्या ठिकाणी प्रामुख्याने निवड झालेल्या उमेदवारांची नेमणुक केली जाईल.
२. अधिक्षक (स्त्री/पुरुष) व गृहपाल (स्त्री/पुरुष) ही पदे निवासी असल्याने विद्यार्थी / विद्यार्थिनींचे पालक या नात्याने शाळेच्या वेळेत व शाळेच्या वेळेनंतर देखभाल करणे, संरक्षण करणे, संगोपन करणे, त्यांच्या आरोग्य विषयक काळजी घेणे, त्यांच्या भोजनाची व निवास व्यवस्थेबाबत काळजी घेणे, मार्गदर्शन करणे, समुपदेशन करणे, चांगले संस्कार करणे इ. बाबींसाठी व शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या जबाबदा-या पार पाडणे व चोवीस तास शासकीय आश्रमशाळेत / शासकीय वसतिगृहात राहणे बंधनकारक आहे.
३. अधिक्षक (स्त्री/पुरुष) संवर्गात उमेदवारांची निवड झाल्यानंतर त्यांना नाशिक विभागातील नाशिक / नंदुरबार / धुळे / अहमदनगर व जळगांव जिल्हयातील कोणत्याही शासकीय आश्रमशाळेवर पदस्थापना देण्यात येईल व त्यांना शासकीय आश्रमशाळेत राहणे बंधनकारक आहे. सोबत अधिक्षक (स्त्री / पुरुष) ही पदे रिक्त असलेलया आश्रमशाळांची यादी दर्शविण्यात आली आहे. त्या ठिकाणी लेखी परिक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांची नेमणुक करण्यात येईल.
४. गृहपाल (स्त्री/पुरुष) संवर्गात उमेदवारांची निवड झाल्यानंतर त्यांना नाशिक विभागातील नाशिक / नंदुरबार / धुळे / अहमदनगर व जळगांव जिल्हयातील कोणत्याही शासकीय वसतिगृहावर पदस्थापना देण्यात येईल व त्यांना शासकीय वसतिगृहावर राहणे बंधनकारक आहे.
५. जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकाचे वय गणले जाईल. उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे असावे. मागासवर्गीय उमेदवांना ५ वर्षे शिथीलक्षम राहिल.
६. अपंग, खेळाडु. प्रकल्पग्रस्त, भुकपंग्रस्त, अंशकालीन उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहिल.
७. जाहिरातीत विहित केलेल्या नमून्यात अर्ज ऑनलाईन पध्दतीने http://maharecruitment.mahaonline.gov.in. या संकेतस्थळावर भरुन त्याची प्रिंट स्वत: जवळ जतन करावी .

८. उमेदवारांस मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.

९. लेखी परिक्षेसाठी व कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवाराला स्वखर्चाने यावे लागेल.

१०. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती (ब,क,ड) विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्गीय उमेदवारांची निवड झाल्यावर सदर उमेदवारांनी सहा महिन्यांच्या आत संबंधीत प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे कार्यालयास जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

११. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती / भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.१.२००४ पासून अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे तत्त्व (क्रिमीलेअर) वि.जा. अ, भ.ज. (ब/क/ड) इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग तसेच महिला व खेळाडु या समांतर अरक्षणातील उमेदवारांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१५-१६ या कालावधीतील (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.

१२. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/२०००/ प्रक्र-४१५/ का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २०१५-१६ या कालावधीतील नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-पअंक-१००९/प्रक्र २००/२००९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेतंर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडे त्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील गट-क पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी तशी नोंद केलेल्या उमेदवारांनाच अंशकालीन या राखीव प्रवर्गासाठी अर्ज करता येतील.

१४. उमेदवार माजी सैनिक असल्यास सैनिक कल्याण बोर्डामध्ये नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (सैनिक जर सेवेत असतांना युध्दात किंवा विशेष मोहिमेत दिवंगत झालेत किंवा सेवते असतांना कायमचे वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांच्या पाल्याचा, पत्नीचा भरतीसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार विचार केला जातो.)

१५. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-एइएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१/०१/१९८० व क्र-न्यायप्र-१००९/प्रक्र २०२/०९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवाराचे नांव नमुद केलेले प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

**१६. जाहिरातीत दिलेल्या पदांची संख्या कमी अथवा जास्त होऊ शकते. त्यामुळे सामाजिक व समांतर आरक्षणाच्या पदामध्ये बदल होऊ शकतो.**

**१७. अर्जात चुकीच्या किंवा अपूर्ण नोंदी असल्यास व योग्य पात्रताधारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज विचारात घेतला जाणार नाही .**

१८. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

१९. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र-आस्था-१००२/प्रक्र ४५/का-१५ दिनांक १०/०८/२००५ अन्वये अपंग उमेदवाराच्या नियुक्ती संबंधात संबंधीत पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि सदर शासन निर्णयातील परिशिष्ठ अ मधील निकष लक्षात घेवून त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने अथवा जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी नियुक्तीसाठी सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबत).

२०. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा ४ दि.३१/१०/२००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यासाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू असेल. सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू राहणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार मानधन / वेतन व भत्ते मिळतील.

२१. उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांचा बारकाईने अभ्यास करावा. उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरुन पडताळणीच्या अधिन राहून ऑनलाईनद्वारे अर्ज स्विकृत करण्यात येतील. उमेदवाराने ज्या पदांसाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता /आरक्षण उमेदवार धारण करित नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

२२. पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेचा दिनांक, वेळ व ठिकाण प्रवेश पत्राव्दारे ऑनलाईन कळविण्यांत येईल.

२३. गृहपाल व अधिक्षक संवर्गाच्या स्वतंत्र लेखी परीक्षा एकाच दिवशी घेण्यात येतील.

२४. पात्र ठरलेल्या उमेदवारांना अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडुन नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२५. महिला उमेदवारांचे लग्नानंतर नावांत बदल असल्यास तशी राजपत्राची प्रत सादर करावी लागेल.

**२६. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग १) क्र-राक्रीधो-२००२/प्रक्र ६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ जुलै २०१६ २) क्र-संकीर्ण-१७१४/प्रक्र ३२५/क्रीयुसे-२ दिनांक २२ एप्रिल २०१५ व ३) क्र-संकीर्ण-१७१७/प्रक्र ३९/क्रीयुसे-२ दिनांक १७ मार्च २०१७ मधील तरतूदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी आरक्षण असल्याने, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ( सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ प्रमाणे विहित प्रमाणपत्र) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.**

२७. अपात्र ठरलेल्या उमेदवारांचे परिक्षा शुल्क परत केले जाणार नाही.

२८. उमेदवारांने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये प्रतिज्ञापत्र दयावे लागेल.

२९. सदरची जाहिरात http://**maharecruitment.mahaonline.gov.in**. या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली आहे.

३०. शासकीय नोकर भरतीला लागु असणारे सर्व नियम या भरतीला लागु राहतील.

३१. उमेवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्य कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास गैरवर्तन करतांना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.

३२. रिक्त पदाच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची तसेच सामाजिक व समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता असल्याने त्याबाबत अर्जदारास कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजिक व समांतर आरक्षण याबाबत बदल करणे व रद्द करणे अंशत: बदल करणे तसेच संपुर्ण भरती प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग, नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.

३३. अधिक्षक (स्त्री/पुरुष) व गृहपाल (स्त्री/पुरुष) या पदांच्या पदभरतीसंबंधी काही न्यायालयीन प्रक्रिया झाल्यास, सदर न्यायालयीन प्रक्रिया ही जिल्हा सत्र न्यायालय, नाशिक व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या कार्यकक्षेतच राहिल याची नोंद घ्यावी

## अधिक्षक व गृहपाल पदांसाठी परिक्षा शुल्क

खुल्या प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये ८००/-
राखीव प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये ४००/-

## ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत

१. पात्र उमेदवारांनी वेबबेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज दिनांक ०३/०४/२०१७ ते २४/०४/२०१७ या कालावधीत http://maharectuitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहिल.

२. उमेदवाराने जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर Apply online या लिंकवर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर या बटणावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. आवश्यक माहिती भरण्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली तुमच्या लॉगिन आयडी आणि पासवर्ड निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रिनवर दाखवेल . याची प्रिंट काढण्याची सुविधा आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवाराने स्वत:च्या अद्ययावत फोटो (रुंदी ३.० से.मी. x उंची ४.५ से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी ३.० से.मी. x उंची २.५ से.मी.) आणि DPI RESOLUTION आणि ५० KB पेक्षा कमी साईच होईल अशा विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.(टिप- फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी) प्रवेशपत्रावर / अर्जावर दुसऱ्याचा फोटो स्वाक्षरी असल्यास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

३. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या सुचना http://maharectuitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील. अर्ज ऑनलाईन अथवा महा ई सेवा केंद्राद्वारे भीता येईल. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेकडून प्रत्येक जिल्हयात महा ई सेवा केंद्र उघडण्यात आलेले आहे. या महा ई सेवा केंद्राची यादी http://mahaonline.gov.in किंवा http://maharectuitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आपले खाते तयार केले नसल्यास उमेवारास नविन वापर कर्ता नोंदणी वर क्लिक करुन युझर नेम व पासवर्ड तयार करावा लागेल.

४. त्यानंतर उमेदवारास प्रोफाईल निर्मिती मध्ये जाऊन स्वत:ची संपुर्ण माहिती भरावी लागेल. http://maharectuitment.mahaonline. gov.in या संकेतस्थळावर यापुर्वी प्रोफाईल निर्मिती स्वत:ची माहिती भरलेली असल्यास पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही. उमेदवार स्वत:ची प्रोफाईल माहिती कधीही अद्ययावत करु शकतो. उमेदवाराने युझरनेम व पासवर्ड नोंद करुन लॉग ईन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंकवर क्लिक करावे. त्या कार्यालयातंर्गत उपलब्ध जाहिराती अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा या संदेशासह दाखविल्या जातील.

५. क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमुद शैक्षणिक पात्रता / अनुभव / इतर बाबीची पुर्तता करीत असल्यास आपला अर्ज स्विकारल्या जाईल. अन्यथा आपला अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखविले जाईल. ज्या उमेदवारांना इंटरनेट द्वारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल. असे उमेदवार महा ई सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज करु शकतात. त्याच वेळी उमेदवारांकडून परीक्ष शुल्क व रुपये ------ ऐवढी रोख रक्कम घेतली जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती (Receipt) महा ई सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो / स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाकडून आकारली जाईल. स्वत: ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणारे उमेदवार कार्यालयाने निश्चित केलेले परिक्षा शुल्क खालील पध्दतीने भरु शकतील.

**परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खालील नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.**

१. उमेदवाराने भारतीय स्टेट बँकेत चलनाद्वारे नेटबँकिंग, डेबीटकार्ड, क्रेडीटकार्ड परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खालील पध्दतीचा अवलंब करावा.

२. युझरनेम व पासवर्डची नोंद करुन लॉगईन केल्यानंतर मुख्य पृष्ठावरील भागातील माझे खाते या लिंकवर क्लिक करावे.

३. माझे खाते या लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नांव निवडल्शनंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर unpaid असे लिहिलेले असेल. त्या ठिकाणी Pay Now अशी लिंक उपलब्ध असेल

४. Pay Now या लिंकवर क्लिक केल्यानंतर पर्याय उपलब्ध होतील (१) ऑनलाईन पेमेंट (२)चलनाद्वारे (३) उमेदवारांना क्रेडीट, डेबीटकार्ड अथवा नेट बँकिंग सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्यच्या अंतीम दिनांकापुर्वी पुर्ण करणे आवश्यक राहिल

५. उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेवून भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

६. चलनाद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवारांकडून परीक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशाप्रकारे उमेदवारास चलनाद्वारे शुल्क भरतांना परीक्षा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील.

७. ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवारा अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करण्यासाठीच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. उमेदवाराने प्रिंट चलन (print challan) या बटणावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे . या प्रिंट केलेल्या चलनावर उमेदवाराने त्याच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया (state bank of india) या बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वरीलप्रमाणे नमुद केलेल्या विहित मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहिल व याची एक प्रत नमुद केलेल्या विहित मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहिल व एक प्रत उमेदवाराने स्वत:कडे जपून ठेवावी.

**किंवा**

८. उमेदवारांनी इंटरनेट बँकिंक अथवा क्रेडीट / डेबीट कार्डाद्वारे त्यांच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क विहित मुदतीच्या आत भरावे.

९. परीक्षा शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने अर्ज भरा या लिंकवर क्लिक करुन आपला उर्वरित अर्ज भरुन पुर्ण करावा आपला अर्ज भरतांना उमेदवाराने स्वत:च्या पासपोर्ट साईजमधील फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे . माहिती पुर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवावी व कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल.
१०. विहित मुदतीत परिक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
११. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत:चा मोबाईल नंबर व ईमेल आयडी काळजीपुर्वक भरावा.

## इतर महत्वाच्या सुचना

१. परीक्षा केंद्र त्या त्या जिल्हयातील उमेदवारास त्यांचे जिल्हयाचे ठिकाणी परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली जाईल. एखाद्या जिल्हयात उमेदवार जास्त झाल्यास त्यांना इतर जिल्हयातही परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्यात येईल.
२. प्रस्तुत परीक्षेपुर्वी पाच दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश पत्र व नमुद केलेल्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
३. परिक्षेच्या वेळी उमेदवाराने उपरोक्त प्रवेश प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे.
४. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले मुळ ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहिल (उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणुक ओळखपत्र, वाहन परवाना)
५. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही उमेदवाराने संबंधीत बँकांच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक आहे.
६. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. भरलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा केला जाणार नाही.

## समांतर आरक्षणाबाबत महत्वाच्या सुचना

| | | |
|---|---|---|
| १. | खेळाडु उमेदवार | खेळाडु या समांतर आरक्षित पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडु<br>राज्य अजिंक्यपद स्पर्धा याचा सदर खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यपेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळांडुचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.<br>अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडुंना शासकीय / निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत **शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग १) क्र-राक्रीधो-२००२/प्रक्र ६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ जुलै २०१६ २) क्र-संकीर्ण-१७१४/प्रक्र ३२५/क्रीयुसे-२ दिनांक २२ एप्रिल २०१५ व ३) क्र-संकीर्ण-१७१७/प्रक्र ३९/क्रीयुसे-२ दिनांक १७ मार्च २०१७ मधील तरतूदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी आरक्षण असल्याने, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ( सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ प्रमाणे विहित प्रमाणपत्र) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.** |
| २. | अंशकालीन उमेदवार | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र-पअंक-१००९/प्रक्र २००/२००९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेतंर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडे त्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीव्युत्तर पदवी तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र असलेले असे अंशकालीन उमेदवार. |

| | | |
|---|---|---|
| ३. | माजी सैनिक / माजी सैनिक पाल्य | सैनिक कल्याण बोर्डामध्ये नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (सैनिक जर सेवेत असतांना युध्दात किंवा विशेष मोहिमेत दिवंगत झालेत किंवा सेवेत असतांना कायमचे वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांच्या पाल्याचा, पत्नीचा भरतीसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार विचार केला जाईल. |
| ४. | प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवार | शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-एइएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१/०१/१९८० व क्र-न्यायप्र-१००९/प्रक्र २०२/०९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवाराचे नांव नमुद केलेले प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे |
| ५. | महिला उमेदवार | महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/२०००/ प्रक्र-४१५/ का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २०१५-१६ या कालावधीतील नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |

**स्वाक्षरी/-**
**अपर आयुक्त,**
**आदिवासी विकास, नाशिक**

# अधिक्षक (स्त्री / पुरुष) या पदासाठी शासकीय आश्रमशाळांची यादी

| अ.क्र | प्रकल्प | आश्रमशाळेचे नांव | तालुका | जिल्हा | अ.क्र | प्रकल्प | आश्रमशाळेचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | बोरीपाडा | त्र्यंबकेश्वर | नाशिक | २ | कळवण | चणकापूर | कळवण | नाशिक |
| | | रायते | त्र्यंबकेश्वर | नाशिक | | | खिराड | कळवण | नाशिक |
| | | ठाणापाडा | त्र्यंबकेश्वर | नाशिक | | | कनाशी | कळवण | नाशिक |
| | | शिरसगांव | त्र्यंबकेश्वर | नाशिक | | | नरुळ | कळवण | नाशिक |
| | | तोरंगण | त्र्यंबकेश्वर | नाशिक | | | दळवट | कळवण | नाशिक |
| | | भिलमाळ | त्र्यंबकेश्वर | नाशिक | | | गणोरे | कळवण | नाशिक |
| | | मुरंबी | त्र्यंबकेश्वर | नाशिक | | | मोहनदरी | कळवण | नाशिक |
| | | देवगांव | त्र्यंबकेश्वर | नाशिक | | | विसापूर | कळवण | नाशिक |
| | | देवडोंगरा | त्र्यंबकेश्वर | नाशिक | | | काठरे (दिगर) | कळवण | नाशिक |
| | | आंबोली | त्र्यंबकेश्वर | नाशिक | | | बापखेडा | कळवण | नाशिक |
| | | कोहोर | पेठ | नाशिक | | | खडे (दिगर) | कळवण | नाशिक |
| | | आसरबारी | पेठ | नाशिक | | | देसगांव | कळवण | नाशिक |
| | | आंबे | पेठ | नाशिक | | | गोपळखडी | कळवण | नाशिक |
| | | बाडगी | पेठ | नाशिक | | | रामेश्वर | देवळा | नाशिक |
| | | म्हसगण | पेठ | नाशिक | | | देवपूरपाडा | देवळा | नाशिक |
| | | चोळमुख | पेठ | नाशिक | | | भिलवाड | बागलाण | नाशिक |
| | | खरपडी | पेठ | नाशिक | | | साल्हेर | बागलाण | नाशिक |
| | | बोरवट | पेठ | नाशिक | | | तताणी | बागलाण | नाशिक |
| | | भुवन | पेठ | नाशिक | | | दोधेश्वर | बागलाण | नाशिक |
| | | इनामबारी | पेठ | नाशिक | | | तळवाडे (भामेर) | बागलाण | नाशिक |
| | | आडगावं भुवन | पेठ | नाशिक | | | हरणबारी | बागलाण | नाशिक |
| | | पिंपळगांव (गरुडेश्वर) | नाशिक | नाशिक | | | दहिंदुले | बागलाण | नाशिक |
| | | देवरगांव | नाशिक | नाशिक | | | वाघंबा | बागलाण | नाशिक |
| | | खेड | इगतपुरी | नाशिक | | | मानुर | बागलाण | नाशिक |
| | | वैतारणा | इगतपुरी | नाशिक | | | विरगांवपाडा | बागलाण | नाशिक |
| | | काळुस्ते | इगतपुरी | नाशिक | | | पळसन | सुरगाणा | नाशिक |
| | | शेणवड | इगतपुरी | नाशिक | | | आंबुपाडा | सुरगाणा | नाशिक |
| | | शिरसाटे | इगतपुरी | नाशिक | | | बुबळी | सुरगाणा | नाशिक |
| | | टिटवे | दिंडोरी | नाशिक | | | माणी | सुरगाणा | नाशिक |
| | | टेपणपाडा | दिंडोरी | नाशिक | | | डोल्हरे | सुरगाणा | नाशिक |
| | | ननाशी | दिंडोरी | नाशिक | | | भोरमाळ | सुरगाणा | नाशिक |

| अ.क्र | प्रकल्प | आश्रमशाळेचे नांव | तालुका | जिल्हा | अ.क्र | प्रकल्प | आश्रमशाळेचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नाशिक | निगडोळ | दिंडोरी | नाशिक | | कळवण | सराड | सुरगाणा | नाशिक |
| | | गांडोळे | दिंडोरी | नाशिक | | | सालभोये | सुरगाणा | नाशिक |
| | | नाळेगांव | दिंडोरी | नाशिक | | | खुंटविहिर | सुरगाणा | नाशिक |
| | | देवसाणे | दिंडोरी | नाशिक | | | करंजुल (सु) | सुरगाणा | नाशिक |
| | | बोपेगांव | दिंडोरी | नाशिक | | | करंजुल (का) | सुरगाणा | नाशिक |
| | | पिंपरखेड | दिंडोरी | नाशिक | | | बोरपाडा | सुरगाणा | नाशिक |
| | | मोकनळ | दिंडोरी | नाशिक | | | पारेगांव | चांदवड | नाशिक |
| | | चास | सिन्नर | नाशिक | | | गरबड | मालेगांव | नाशिक |
| | | धोंडबार | सिन्नर | नाशिक | | | पांढरुण | मालेगांव | नाशिक |
| | | नाशिक | नाशिक | नाशिक | | | डुबगुले | मालेगांव | नाशिक |
| ३ | धुळे | सुकापुर | साक्री | धुळे | ४ | तळोदा | चुलवड | अक्राणी | नंदुरबार |
| | | बोपखेल | साक्री | धुळे | | | झापी | अक्राणी | नंदुरबार |
| | | शिरसोले | साक्री | धुळे | | | मांडवी | अक्राणी | नंदुरबार |
| | | नवापाडा | साक्री | धुळे | | | हातधुई | अक्राणी | नंदुरबार |
| | | शेवगे | साक्री | धुळे | | | काकरदा | अक्राणी | नंदुरबार |
| | | रोहोड | साक्री | धुळे | | | शिंदी दिगर | अक्राणी | नंदुरबार |
| | | उमरपाटा | साक्री | धुळे | | | शेलगदा | अक्राणी | नंदुरबार |
| | | वार्सा | साक्री | धुळे | | | तोरणमाळ | अक्राणी | नंदुरबार |
| | | राईनपाडा | साक्री | धुळे | | | असली | अक्राणी | नंदुरबार |
| | | पांगण | साक्री | धुळे | | | बिजरी | अक्राणी | नंदुरबार |
| | | विहिरगांव | साक्री | धुळे | | | सोनखुर्द | अक्राणी | नंदुरबार |
| | | चरणमाळ | साक्री | धुळे | | | तलाई | अक्राणी | नंदुरबार |
| | | अक्कलकोस | शिंदखेडा | धुळे | | | रोषमाळ | अक्राणी | नंदुरबार |
| | | सुलवाडे | शिंदखेडा | धुळे | | | वालावल | अक्राणी | नंदुरबार |
| | | म्हळसर | शिंदखेडा | धुळे | | | तेलखेडी | अक्राणी | नंदुरबार |
| | | उमरदा | शिरपूर | धुळे | | | त्रिशुल | अक्राणी | नंदुरबार |
| | | लौकी | शिरपूर | धुळे | | | नाला | अक्राणी | नंदुरबार |
| | | कोडीद | शिरपूर | धुळे | | | जांगठी | अक्राणी | नंदुरबार |
| | | जामण्यापाडा | शिरपूर | धुळे | | | भांग्रापाणी | अक्राणी | नंदुरबार |
| | | हिवरखेडा | शिरपूर | धुळे | | | कुंभारखान | अक्राणी | नंदुरबार |
| | | अर्धेखुर्द | शिरपूर | धुळे | | | गमन | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | शिरपुर (इंग्रजी) | शिरपूर | धुळे | | | मोरंबा | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | नंदुरबार | खेकडा | नवापूर | नंदुरबार | | | तालंबा | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | धाराट | नवापूर | नंदुरबार | | | बर्डी | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | कोळदे | नवापूर | नंदुरबार | | | दाब | अक्कलकुवा | नंदुरबार |

| अ.क्र | प्रकल्प | आश्रमशाळेचे नांव | तालुका | जिल्हा | अ.क्र | प्रकल्प | आश्रमशाळेचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नंदुरबार | बंधारे | नवापूर | नंदुरबार | | तळोदा | भगदरी | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | ढोंगसागाळी | नवापूर | नंदुरबार | | | वडफळी | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | नावली | नवापूर | नंदुरबार | | | होराफळी | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | भादवड | नवापूर | नंदुरबार | | | सरी | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | देवमोगरा (आदर्श) | नवापूर | नंदुरबार | | | मोजरा | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | बोरचक | नवापूर | नंदुरबार | | | अलीविहिर | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | वडकळंबी | नवापूर | नंदुरबार | | | खडकापाणी | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | खडकी | नवापूर | नंदुरबार | | | कंकाळमाळ | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | निजामपूर | नवापूर | नंदुरबार | | | दहेल | अक्कलकुवा | नंदुरबार |
| | | पानबारा | नवापूर | नंदुरबार | | | शिर्वे | तळोदा | नंदुरबार |
| | | अंजाणे | नवापूर | नंदुरबार | | | सलसाडी | तळोदा | नंदुरबार |
| | | नवापूर (इंग्रजी) | नवापूर | नंदुरबार | | | बोरद | तळोदा | नंदुरबार |
| | | आमसरपाडा | नवापूर | नंदुरबार | | | राणीपुर (त) | तळोदा | नंदुरबार |
| | | ठाणेपाडा | नंदुरबार | नंदुरबार | | | लोभाणी | तळोदा | नंदुरबार |
| | | वाघाळे | नंदुरबार | नंदुरबार | | | अमोणी | तळोदा | नंदुरबार |
| | | लोय | नंदुरबार | नंदुरबार | | | जांभाई | तळोदा | नंदुरबार |
| | | कोठली | नंदुरबार | नंदुरबार | | | इच्छागव्हाण | तळोदा | नंदुरबार |
| | | खोक्राळे | नंदुरबार | नंदुरबार | ६ | राजुर | मवेशी | अकोले | अहमद नगर |
| | | भालेर | नंदुरबार | नंदुरबार | | | केळीरुमणवाडी | अकोले | अहमद नगर |
| | | रामपूर | शहादा | नंदुरबार | | | खिरविरे | अकोले | अहमद नगर |
| | | चांदसेली | शहादा | नंदुरबार | | | पैठण | अकोले | अहमद नगर |
| | | गणोर | शहादा | नंदुरबार | | | कोहणे | अकोले | अहमद नगर |
| | | चिरखान | शहादा | नंदुरबार | | | के ळीकोतुळ | अकोले | अहमद नगर |
| | | राणीपुर (श) | शहादा | नंदुरबार | | | तिरडे | अकोले | अहमद नगर |
| | | शहाणे | शहादा | नंदुरबार | | | पिंपरकणे | अकोले | अहमद नगर |
| | | सुलतानपूर | शहादा | नंदुरबार | | | घाटघर | अकोले | अहमद नगर |
| | | नवलपुर | शहादा | नंदुरबार | | | भंडारदरा (आदर्श) | अकोले | अहमद नगर |

| अ.क्र | प्रकल्प | आश्रमशाळेचे नांव | तालुका | जिल्हा | अ.क्र | प्रकल्प | आश्रमशाळेचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नंदुरबार | शहादा | शहादा | नंदुरबार | | राजूर | रतनवाडी | अकोले | अहमद नगर |
| | | मलगांव | शहादा | नंदुरबार | | | शिरपुंजे | अकोले | अहमद नगर |
| ५ | यावल | वैजापुर | चोपडा | जळगांव | | | पळसुंदे | अकोले | अहमद नगर |
| | | देवझिरी | चोपडा | जळगांव | | | राजुर (इंग्रजी) | अकोले | अहमद नगर |
| | | विष्णापूर | चोपडा | जळगांव | | | करंडी | अकोले | अहमद नगर |
| | | कृष्णापुर | चोपडा | जळगांव | | | गदर्णी | अकोले | अहमद नगर |
| | | वाघझिरा | यावल | जळगांव | | | पांगरी | अकोले | अहमद नगर |
| | | डोगर कठोरा | यावल | जळगांव | | | कोळेवाडी | राहुरी | अहमद नगर |
| | | माळोद | यावल | जळगांव | | | म्हसवंडी | संगमोर | अहमद नगर |
| | | लालमाती | रावेर | जळगांव | | | भोजदरी | संगमोर | अहमद नगर |
| | | जोंधनखेडा | मुक्ताईगर | जळगांव | | | जवळेबाळेश्वर | संगमोर | अहमद नगर |
| | | पळसखेडा | बोदवड | जळगांव | | | अकलापूर | संगमोर | अहमद नगर |
| | | वलठाण | चाळीसगांव | जळगांव | | | साकुर | संगमोर | अहमद नगर |
| | | गंगापुरी | जामोर | जळगांव | | | सावरचोळ | संगमोर | अहमद नगर |
| | | कुंभारी | जामोर | जळगांव | | | पळशी | संगमोर | अहमद नगर |
| | | पिंगळवाडा | अमळोर | जळगांव | | | | | |
| | | दहिवद | अमळोर | जळगांव | | | | | |
| | | चांदसर | धरणगांव | जळगांव | | | | | |
| | | सोनबर्डी | एरंडोल | जळगांव | | | | | |
| | | सार्वे (खुर्द) | पाचोरा | जळगांव | | | | | |

## गृहपाल (स्त्री / पुरुष) या पदासाठी शासकीय वसतिगृहांची यादी

| अ.क्र | प्रकल्प | वसतिगृहाचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | कळवण | मुलांचे मुल्हेर | सटाणा | नाशिक |
| २ | | मुलांचे अभोणा | कळवण | नाशिक |
| ३ | नंदुरबार | मुलांचे नागझिरी | नवापूर | नंदुरबार |
| ४ | | मुलांचे नंदुरबार | नंदुरबार | नंदूरबार |
| ५ | | मुलांचे नंदुरबार (१००० क्षमता) | नंदुरबार | नंदूरबार |
| ६ | | मुलांचे नवापूर | नवापूर | नंदुरबार |
| ७ | | मुलींचे करंजी | नवापूर | नंदुरबार |
| ८ | | मुलींचे नंदुरबार (नविन) | नंदुरबार | नंदूरबार |
| ९ | | मुलींचे नंदुरबार | नंदुरबार | नंदूरबार |
| १० | | मुलींचे नटावद | नवापूर | नंदुरबार |
| ११ | | मुलींचे लोणखेडा | नवापूर | नंदुरबार |
| १२ | | मुलींचे शहादा नविन | शहादा | नंदुरबार |
| १३ | तळोदा | मुलांचे तळोदा नविन-३ | तळोदा | नंदुरबार |
| १४ | | मुलांचे तळोदा नविन | तळोदा | नंदुरबार |
| १५ | | मुलांचे तळोदा-४ | तळोदा | नंदुरबार |
| १६ | | मुलींचे अक्कलकुवा | अक्कलकुवा | नंदुरबार |
| १७ | | मुलींचे तळोदा नविन | तळोदा | नंदुरबार |
| १८ | धुळे | मुलांचे धुळे | धुळे | धुळे |
| १९ | राजूर | मुलींचे शेडी | अकोले | अहमदनगर |

# आदिवासी विकास सेवा संवर्गातील गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांचा (सामाजिक व समांतर आरक्षणानुसार) तपशिल दर्शविणारे विवरणपत्र

| पदाचा संकेतांक | पदाचे नांव | एकूण पदे | अनु जाती | अनु जमाती | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अधिक्षक (पुरुष) | २२ | २ (सर्वसा-२) | २ (सर्वसा-२) | १ (सर्वसा-१) | ० | १ (सर्वसा-१) | **१** (सर्वसा-१) | १ (सर्वसा-१) | ३ (सर्वसा-३) | ११ (मा.सै.-२, खेळा-१, अंशका-१, प्रकल्प-१,सर्वसा-६) |
| २. | अधिक्षक (स्त्री) | ११३ | **१९** (महि-६,मा.सै.-३, खेळाडु-१, अंशका-२, प्रकल्प-१, सर्वसा-६) | **४** (महि-१, मा.सै.-१, सर्वसा-२) | **६** (महि-२, मा.सै.-१, अंशका-१ सर्वसा-२) | **३** (महि-१, सर्वसा-२) | **६** (महि-२, मा.सै.-१, अंशका-१ सर्वसा-२) | **३** (महि-१, सर्वसा-२) | **३** (महि-१, सर्वसा-२) | **३२** (महि-१०,मा.सै.-५, खेळाडु-२, अंशका-३ भुकंप-१, प्रकल्प-२, सर्वसा-९) | **३७** (महि-११,मा.सै.-६, खेळाडु-२, अंशका-४ भुकंप-१, प्रकल्प-२, सर्वसा-११) |
| ३. | गृहपाल (पुरुष) | १० | ३ (सर्वसा-३) | १ (सर्वसा-१) | ० | १ (सर्वसा-१) | ० | १ (सर्वसा-१) | ० | **२** (सर्वसा-२) | **२** ( सर्वसा-२) |
| ४. | गृहपाल (स्त्री) | ०५ | २ (सर्वसा-२) | १ (सर्वसा-१) | ० | ० | ० | ० | ० | **१** (सर्वसा-१) | १ (सर्वसा-१) |
| **एकूण** | | **१५०** | **२६** | **८** | **७** | **४** | **७** | **५** | **४** | **३८** | **५१** |

स्वाक्षरी/-
अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नाशिक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | महि | :- | महिला | ५. | अंशका | :- | अंशकालीन कर्मचारी |
| २. | अपं | :- | अपंग | ६. | भुकंप | :- | भुकंपग्रस्त |
| ३. | मा.सै | :- | माजी सैनिक | ७. | प्रक | :- | प्रकल्पग्रस्त |
| ४. | खेळा | :- | खेळाडु | ८. | सर्वसा | :- | सर्वसाधारण |